PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

# ख्रिस्ती धर्मातील काही निवडक घटक

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहास विभाग,
कबचौउमवि, जळगाव. **महाराष्ट्र भारत**

***''ज्यू इतिहासकार जोसेफस म्हणतो की सिकंदर (अलेक्झांडर )यरुसलेमला जाण्यासाठी खूप उतावळा झाला होता.का?"देवाचे परमपवित्र स्थानाचे दर्शन घेण्यासाठी.''***

**प्रस्तावना:-**

ख्रिस्ताची ऐतिहासिकता आणि माझा विश्वास.द्वेषाने पेटलेल्या या जगात ख्रिस्ताने दाखविलेले प्रेम हाच खरोखर व अपूर्व चमत्कार नव्हे का? त्याने केलेल्या चमत्कारांच्या म्हणून ज्या कथा गोस्पल मध्ये वर्णील्या आहेत,त्याहून शत्रूबद्दल दाखविलेले प्रेम हा कितीतरी पटींनी मोठा चमत्कार नव्हे काय?अर्वाचीन रूढ अर्थाने तो चर्चवाला नव्हता.त्याला विधिविधानाचा तिटकारा होता.कोंडलेली व गजबजलेली प्रार्थना-मंदिरे त्याला आवडत नसत,त्याचे चर्च मोकळ्या जागेत होते.रस्त्याच्या कडेचा एखादा दगड हेच त्यांचे व्यासपीठ,तद्वतच जाडाभरडा व प्रवासामुळे जीर्णशिर्ण झालेला एखादा झगा हाच त्यांचा पोशाख असे,आणि आपल्या मातृभूमीची गाणी गाणारे ज्यू मजूर त्याचे साथीदार असत,ख्रिस्त आज जिवंत असता तर आपल्या नावाने चालणारी युद्धे,तद्दतच करण्यात येणारे द्वेष-मत्सर,छळ व अपराध पाहून तो विस्मितचं झाला असता,ज्या ज्यू राष्ट्राने ख्रिस्ती लोकांना ख्रिस्त दिला, त्याच ज्यूची निंदा चर्चवाले करीत आहेत,असे त्याला दिसले असते तर ...तो रुमानियात जाईल तर त्याला तेथील लोक धावत्या आगगाडीच्या डब्याच्या खिडकीतून बाहेर फेकून देतील,तो पैलेस्टाईनमध्ये जाईल तर अरब लोक त्याला ठार करतील व जवळच उभे असणारे ख्रिस्तीधर्मी इंग्रज सैन्य ती गमंत पाहत राहतील,अमेरिकेतही पुष्कळशा कॉलेजात ख्रिस्ताला प्रवेश मिळणार नाही,थोडक्यात म्हणजे

आज जर ख्रिस्त जिवंत होऊन येईल तर त्यालाही ख्रिस्ती राष्ट्रांना स्वतःच्या धर्माकडे घेऊन जाणे अशक्यप्राय होईल व मान हलवून म्हणावे लागेल "हे प्रभो,हे तात,यांना क्षमा कर.आपण काय करीत आहोत हे यांना कळत नाही"पहिल्या जलप्रलयात एकच धर्मी देवाला भेटला,पहिल्या आगमनात ख्रिस्ताने तारणाचा मार्ग मोकळा करून दिला आणि सर्व मानवजातीसाठी आपले पवित्र रक्ताचे बलिदान दिले,दुसऱ्या आगमनाबद्धल ख्रिस्त खंत व्यक्त करतात की मला विश्वास भेटेल का?_ *काय मी ख्रिस्ताचा कसोटीवर उतरत आहे,तारणासाठी काय मी एक धर्मी म्हणून नोहा सारखा तयार आहे,ख्रिस्त येणार असून त्याचा एकच प्रश्न राहणार  तुम्ही तयार आहात का?

**पवित्र व्यक्तीची भाषा कोणती?:-**

_"मनुष्य कशात आनंद पावतो,तर त्याच्या 'देवामध्ये' चैनबाजी व मालमत्ता यांचा पाठलाग करण्याची बिचारे जगिक लोक खटपट करत असतात,महत्वाचे सोडून सावल्यांचा ते व्यर्थ पाठपुरावा करतात,पण ख्रिस्ती व्यक्ती देवाच्या अद्भुत परिपूर्णेतेत हर्ष करते...दैहिकतेला आत्मिक गोष्टी अतिशय कंटाळव्यांना वाटतात पण खरा ख्रिस्ती म्हणतो "देवाजवळ जाणे ह्यातच माझे कल्याण आहे_ (स्रोत ७३:२८)आणि हीच एका पवित्र व्यक्तीची भाषा आहे.पवित्र व्यक्तीची भाषा असते की"अंजिराचे झाड न फुलले,द्राक्षाची वेलीस फळ न आले,जैतुनाचे उत्पन्न बुडाले,शेतात धान्य न पिकले,मेंढ्यावाल्याचे कळप नाहीसे झाले,व गोठ्यात गुरेढोरे न उरली तरी परमेश्वराच्या ठाई हर्ष पावेन.मला तारण देणाऱ्या देवाविषयी मी उल्लास करिन. (हबक्कुक:३-१७-१८)हृदयाला देवामध्ये समाधान प्राप्त झाल्याबद्धल अंतःकरणातुन स्तुती बाहेर पडते.तेव्हा भाषा अशी असते,परमेश्वराचा धन्यवाद मी सर्वदा करिन,माझ्या मुखात त्याचे स्तवन सतत असेल. *हीच एका पवित्र व्यक्तीची भाषा असते."जितकी आपली अंतःकरणे खऱ्या स्तुतीला उद्युत होतील तितके आपण आपल्या महान देवाची स्तुती,प्रशंसा व आभारप्रदर्शन करतांना आढळून येऊ,हाच देवाचे वचन आपल्याना फायद्याचे ठरत असल्याच्या स्पष्ट व उघड पुरावा आहे.हीच एका पवित्र व्यक्तीची भाषा असते.

**परिवर्तन:-काय नाही:-**

"पापाविषयी खंत नाही-परिवर्तन नाही.जुन्या जीवनाचा त्याग नाही-परिवर्तन नाही.जगापासून विभक्त नाही-परिवर्तन नाही." आपल्या पातकामुळे व्यक्तींनी पवित्र परमेश्वरासमोर स्वतःस खजील व दुःखी असे अनुभवले आहे का?.त्या व्यक्तींने खरोखर पश्चाताप करून आपली आशा प्रभू येशूच्या वधस्तंभावरील कार्यावर ठेवली आहे का?.ख्रिस्ताला आपला तारणारा व प्रभू म्हणून या व्यक्तींनी स्वतःला त्याच्या स्वाधीन केले आहे का?ख्रिस्ती जीवनात परिवर्तन काय आहे याचा जेवढा उहापोह केला जातो,त्या उलट परिवर्तन काय नाही,या शिर्षकाचे संदेश अनेक उपदेशकांचा वहीत कोरे स्वरूपाचे असतील,याचे एक कारण आहे,काही उपदेशक शिकवितात की परिवर्तनकर्त्याच्या प्रभू ख्रिस्ताविषयीचा दृष्टीकोनात होणारा  बदल म्हणजे ख्रिस्ती जीवनात परिवर्तन होणे* मला समजत नाही हे कोणते परिवर्तन आहे.एकदा मी एका उपदेशकाबरोबर नदीकाठी काही लोकांच्या बाप्तिस्मासाठी गेलो,पाळकांनी पाच लोकांना बाप्तिस्मा दिला आणि सांगितले, *आज पासून तुमचे तारण झाले

आहे,आणि एक सल्ला दिला आता तुम्ही काही चुक्या केल्या तरी चालेल पण पश्चाताप करून स्वतःला पुन्हा शुद्ध करून घ्यायचे* ,मला आश्चर्य वाटले,हा परिवर्तनाचा संदेश नाही,पापाचा दंडापासून तुम्ही वाचला आहे,आणि आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे,आणि ही देवाची कृपा आहे.म्हणून तारणाचे (खऱ्या परिवर्तनाचे) प्रतीक म्हणून तुम्ही बाप्तिस्मा घेता.म्हणून *प्रेषित पौल* लिहितो _"स्वाभाविक वृत्तीच्या माणूस,देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारत नाही,कारण त्या त्याला मूर्खपणाचा वाटतात,आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत.कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते" (१करिंथकरासपत्र:२-१४).ख्रिस्ती परिवर्तन काय नाही हे जाणल्यास,आपल्याना ख्रिस्ती धर्मात जे उपदेशक वचनाद्वारे अज्ञानाचे ज्ञान देतात ते आणि स्वतःला खरे ख्रिस्ती म्हणविणारे पण परिवर्तन न झालेले ओळखता येतील.

**"देवाच्या वचनातील सत्य मानवाचा न्याय करील:मानव देवाच्या वचनाचा न्याय कधीच करू शकत नाही."**_

**"मानवाचे नैतिक आणि आत्मिक आंधळेपण काय असते"**

"मानव आध्यात्मिक दृष्ट्या मृत आहे,त्याला पुनरुज्जीवन होण्यासाठी लहानशी पेटती ठिणगीही नाही,मृत शव आपल्या पुनरुत्थानासाठी कधीच पुढाकार घेऊ शकत नाही,मानवाचा नैतिक कल पाप व स्व-इच्छा याकडे इतका झुकलेला आहे की केवळ देवानेच मध्यस्थी करून त्याला त्यातून बाहेर काढायला पाहिजे...अंधकार अंधकाराला प्रकाश देऊ शकत नाही.प्रकाशाकडे आल्याने आंधळ्यामध्ये प्रकाश निर्माण होऊ शकत नाही.मोतिबिंदूने अंध झालेल्या डोळ्यास प्रकाश पुरविल्याने त्या डोळ्याला पूर्ववत दृष्टी प्राप्त होत नाही."( **स्टीव्ह फर्नांडिस,एकदा तारलता की कायमचे बदललात,पृ क्र-१४-१५.)**"मनुष्याचे तारण हे पूर्णतः देवाच्या कृपेवर अवलंबून आहे.तारण न झालेली मनुष्य ही नेहेमीसाठी शारीरिक आणि आत्मिक आंधळी आहेतच,पण ख्रिस्ती धर्मातील काही पुढारी आणि व्यक्ती नैतिक आणि आत्मिक दृष्टया आंधळे आहेत.त्यांचे काय?परिवर्तन घडवून आणण्यास पाळक आणि ख्रिस्ती व्यक्ती असमर्थ आहे,जो पर्यंत त्यांना देवाकडून पवित्र आत्मा आणि पवित्रशास्त्र वचनातून प्रेरणा मिळत नाही,पण काही बहादरांची गोष्टच वेगळी आहे,आपल्या सीमित बायबल ज्ञानाने आणि पवित्रतेचा खाली वाटीने ते इतरांची विहीर भरण्याच्या प्रयत्न करतात जे एका मनुष्यासाठी अशक्य आहे.कारण मानव अक्षम आहे देवालाच सर्व सत्य गोष्टी शक्य आहे,म्हणून "लोक खोट्या धार्मिकतेने चालतात हे सत्य आपल्याना पक्के माहीत असायला हवे.त्यांच्या विश्वास चुकीचा असू शकतो.तथापि ते पापी जीवनासाठी अखेरीस सत्याचा त्याग करतात,यावरून हे उघडकीस येते."

**असमर्पित ख्रिस्ती लोकांना आणि पाळक यांना गाळावे:-**

"असमर्पित ख्रिस्ती व्यक्तींना आश्चर्यकारक रीतीने मंडळीत जागा मिळाली आहे.त्यामुळे ज्यांची ख्रिस्ताविषयीची वृत्ती ते पापात असल्याची लक्षणे दाखवते अशा ख्रिस्ती म्हणवून घेणाऱ्या लोकांसाठी आता पुष्कळ सेवा चालू आहे.म्हणूनच ख्रिस्ताशी एकनिष्ठ नसणाऱ्या व त्यांच्या दाव्यांचा तिरस्कार

करणाऱ्या लोकांसाठीच उपदेश व सुवार्तापद्धती जाणीवपूर्वक आखल्या जात आहेत.ख्रिस्ती म्हणवणाऱ्या पण पापाशी झगडत असणाऱ्या लोकांसाठी सल्ला देणाऱ्या तत्वप्रणाली आखल्या जात आहेत.पण ही पापे तर पुनरुज्जीवन न झालेल्या अंत:करणांची बंडखोरी वृत्तीच दाखवतात. *मंडळींची वृद्धी होण्यासाठी वापरलेली तत्वे ख्रिस्ताच्या योग्य अधिकाराखाली अधीन होण्याऐवजी धर्माचे संरक्षण व विवेकभावना खुष करण्यासाठी दैहिक इच्छापूर्ती करण्यास वाव देतात."असमर्पित ख्रिस्ती लोकांना किती वेळ झेलावे.हे त्या मंडळीतील पाळकावर आधारलेले आहे,पण पापाचा धिक्कार आणि सत्याच्या स्वीकार करावा लागेल,ख्रिस्ताचे सत्य आपण डुकऱ्यांपुढे किती दिवस टाकत राहणार,असमर्पित ख्रिस्तीची देखील तिचं अवस्था असते,म्हणून ते ख्रिस्ताशी एकनिष्ठ नसतात.तर नेहेमी पाप करण्यासाठी बंडखोरी करीत असतात.तरी देखील अशा असमर्पित ख्रिस्ती लोकांना खुष करण्यासाठी काही वाव देणाऱ्या ख्रिस्ती मंडळींची कमी नाही.म्हणून प्रेषित पौल लिहितो "पापाची सत्ता तुम्हावर चालणार नाही,कारण तुम्ही नियमशास्त्राधीन नाही तर कृपाधीन आहा"(रोम ६:१४) तसेच "सुंताही काही नाही,बेसुंताही काही नाही,तर नवी उत्पत्ती हिचीच काय योग्यता आहे"(गलाती:६१५).आज असमर्पित ख्रिस्ती व्यक्तींची संख्या वाढल्याचे कारण,पौल सांगतो त्याप्रमाणे ते नियमशास्त्राधीन आहे,त्यांच्यावर पापाची सत्ता चालते. *म्हणून आता प्रत्येक ख्रिस्ती पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे की त्यांनी आपल्या मंडळीतील असमर्पित ख्रिस्ती लोकांना दोन किंवा तीनदा सावधान करून,ख्रिस्ती मंडळीतून गाळावे.आणि जर पाळकच असमर्पित असेल तर त्याला मंडळीतील सदस्यांनी एकत्र मत घेऊन गाळावे."

**कृपा काय आहे/What is grace:-**

१) **आचार्य दयाप्रकाशजी:-**

"खऱ्या ख्रिस्ती अनुभवासाठी कठोर तपाचरण,जपजाप्य,विधी-विधान यांचे महत्व नाही,समाजसेवा केली तरी त्या सेवेने मोक्ष मिळत नाही.खरे ख्रिस्ती जीवन तारणाऱ्या वैयक्तिक अनुभवातून प्राप्त होते आणि हा अनुभव देवाच्या कृपेने प्रभू येशूमध्ये मिळतो हे स्पष्टच आहे."मनुष्याची कर्मे व्यर्थ आहे,त्याचे हात निष्फळ आहे,त्याचे शब्द प्रभावहीन आहे,त्यांचे मार्ग पराजयाने भरलेले आहे,देवाची कृपा मनुष्याचे सर्व तारणाबद्धलचे मार्ग भरून काढते.

२) **बिशप डरबी:-**

मी तुझ्या पुत्रासारखा होईन,ही तिच कृपा आहेका,जी त्याने माझ्यासाठी मिळवली?वैभवी पित्या(विचारापलिकडला विचार) त्याच्या स्वतःच्या प्रतिष्ठेत,त्याच्या प्रतिमेत आणले"म्हणून *जॉन आगस्तीन* म्हणतात "विश्वासणाऱ्यानी त्यांच्या पात्रतेपेक्षा जास्त आनंदी राहण्याची सवय करायला हवी".कारण देवाची कृपा प्रत्येक दिवसाला वेळेनुसार वाढत जाते आणि तिचा प्रकाश तेजोमय होत जातो.

३) **टोपलेडी यांचे गीत *Rock of Ages***"जरी रडे अनिवार,जरी सत्कृत्ये अपार,तरी होईना उपाय,बुडतो तुझ्या शिवाय,प्रभू ख्रिस्ता मी लाचार,मला तू स्वरक्त तार, पुण्यहीन मी दुर्बळ,क्रुस धरतो केवळ,नग्न,वस्त्र मागतो,पापी,कृपा चाहतो, आलो शरण मलीन कर साफ वा मरीन"गीताचा सारांश एका ओळीत सांगता येईल *"मनुष्य देवाचा कृपेशिवाय शुन्य आणि नगण्य आहे"

४) **संत पौल:-**

_"त्याच्या करूनमुळे आपण उपकृत झालो आहोत.आपण आपले सर्वस्व आपल्या जीवंत पवित्र देवाला त्याच्या सेवेकरिता ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पित करावे हे आपले आद्य कर्त्यव्य आहे." *मनुष्याचे मुख्य कर्त्यव्य देवाचे भय मानून त्याची आज्ञा पाळणे यात आहे.''

५) **जॉन न्यूटन:-**

**_Amazing Grace_**

"अद्भुत कृपा, किती मधुर नाद मज भ्रष्टा तारीले हरवलेला मी आता सापडलो गेले अंधत्व,पाहतो.कृपेनेच शिकवले या ह्रदयाला भय कृपेनेच भय दुरही केले.मौल्यवान किती ती कृपाही भासली विश्वासण्याच्या क्षणी हो मला.संकटे,परिश्रम,आमिषामधून मी आलो येथवरी कृपेनेच आणिले,मज येथवरी कृपाच नेईल घरी.तेथे असू आपण ,हजारो वर्षे प्रकाशात सुर्यासमान गौरव देवाचे गातच राहू या आरभिल्या क्षणापासून."देवाची कृपा ही अनंतकाळासाठी आहे,पण ते देवच साध्य करू शकतो,मनुष्य प्रयत्न करूनही काही करू शकत नाही.जर परमेश्वर तुम्हास आज विचारेल, तुला जीवनात काय हवे?तर तुम्ही काय उत्तर द्याल?लक्षपूर्वक ऐका;तो तुम्हाला विचारात आहे.माझे तर एकच उत्तर राहिल.'कृपा.''कृपेच्या दुरूपयोग करणारे* आदम आणि हव्वा सारखे वागतात. *ज्यांना पाप करून नग्नतेचे वास्तववादी दर्शन होते आणि पापाचा परिणाम दिसतो* .तरी देखील ते ढोंगीपणाने देवापुढे गुडघे टेकून म्हणतात *आम्ही पाप केले नाही.

**( "तुमच्या भावना ख्रिस्तासाठी आहे की जगासाठी" )**

"फुटबॉल अथवा बेसबॉल या खेळाच्या वेळी एखादा प्रेक्षक अत्यंत उत्तेजित होऊन आवेशाने आरडाओरडा करू लागतो.पण वधस्तंभाकडे पाहून एखादा पापी स्फुंदून रडत असलेला पाहिला की हाच प्रेक्षक नाक मुरडून म्हणतो,की सारे ढोंग आहे,हा भावनांचा खेळ आहे प्रेक्षकाला खऱ्या भावनांची किंमत कळत नाही."("My Commend" डॉ.ई. संगस्टर )"कालच इंग्लंड आणि न्यूजिलँड ची क्रिकेट मॅच झाली फायनल मध्ये किती ख्रिस्ती लोकांचा जीव अटकला असेल हे सांगायची गरज नाही,कारण हा भावनांचा खेळ आहे,मग वधस्तंभ काय आहे?वधस्तंभ देखील आमच्या आत्म्यातील भावनांशी संबंधित आहे पण त्याला पाहून काही वेळेस आम्हाला रडु येत नाही.का?कारण आमच्या या जगाशी जडलेल्या भावना आम्हाला ख्रिस्ताचा प्रेममय अंत:करणांपासून दूर ठेवतात.डॉ बिली ग्रॅहम म्हणतात "ख्रिस्ती झाल्यावर हवे तसे आचरण करण्यास आपणास मुभा मिळते अशा अर्थाचे एकही वचन पवित्र

शास्त्रात आढळणार नाही...आधुनिक ख्रिस्ती लोक पवित्र शास्त्रातील पश्चाताप या शब्दाचा अपभ्रंश करतात.आपल्या हातून पातक घडले की,त्याबद्धल नापसंती व खेद व्यक्त करावयाचा "छे बुवा;चूक झाली माझ्याकडून"असे म्हणावयाचे व पूर्ववत जीवनक्रम आचरण्यास मोकळे व्हावयाचे अशी पाश्चातापाची व्याख्या ते करतात."ख्रिस्ती धर्मात भावनांना खूपच महत्व आहे.कारण धन्य आहे ते,जे शोक करिता,कारण स्वर्गाचे राज्य त्यांचेच आहे.यरुसलेमला पाहून ख्रिस्त रडला,म्हणून ख्रिस्ती व्यक्तीच्या भावना त्याच्या सेवेकरिता खूपच महत्वाच्या आहेत."

१) ख्रिस्ती तरुणांनी आपल्या भावना तारुण्यात देवाला अर्पण कराव्या

२)भावनांचा उपयोग फक्त एक ख्रिस्ती म्हणून दिन-दुबळ्या लोकांसाठी करावा

३)देवाचे कार्य कधी निष्फळ होत नसते,तसेच शौकीत हृदय नेहेमी देवाच्या राज्यासाठी तत्पर असते.

अंतिमतः विलियम मैडोनाल्ड म्हणतात "किती खरे आहे;सामुदायिक सुवार्ताप्रसाराच्या सभेतून आवेशी भावनामध्ये ख्रिस्तासाठी निर्णय घेणे ही गोष्ट वेगळी,पण स्वतःचा नकार करणे व दररोज वधस्तंभ घेऊन ख्रिस्ताला अनुसरणे ही गोष्ट अगदीच वेगळी.

**मंडळींचा आत आणि बाहेर कोण?**

"मंडळी म्हणजे मेंढपाळाला ओळखणारा समूह होय;याशिवाय असणारी गोष्ट म्हणजे मंडळी नाही".खूपच महत्वाचा मर्म या व्याख्येत दळलेला आहे,ख्रिस्त स्वतः म्हणतो 'मेंढरे मेंढपाळाची वाणी ऐकतात(समजतात)'.पण आज मंडळीतील काही विश्वासी पाळकाला ओळखत नाही आणि पाळक विश्वासीला,असा पाळक आणि विश्वासी मंडळीतील आत्मिक युद्धातून आणि मंडळीतील ध्येय आणि दर्शनातुन नेहेमी बाहेर चालतात.प्रश्न हा पण उत्पन्न होतो-जे ख्रिस्ती लेखक ख्रिस्ताचा विषय सोडून अन्य विषयावर आपले लक्ष केंद्रित करतात. आणि अशा ख्रिस्ती बाह्य लिखाणावर जे ख्रिस्ती लोक आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात ते मंडळींचा आत आहे की बाहेर?

**मंडळींचा साधक ख्रिस्त आणि तुम्ही:-**

"ख्रिस्तीतर मूल्याच्या प्रभाव जगावर टाकण्यासाठी जगाकडे भरपूर साधनसामग्री आहे.परन्तु मंडळींकडे एकच साधन आहे;ते म्हणजे ख्रिस्त.ख्रिस्ताशिवाय माझ्या अस्तित्वाचे काहीच महत्व नाही,ख्रिस्ती जीवनाचे मूळ ख्रिस्त आहे,त्याने दिलेला महान आदेश आहे.(मत्तय-२८:१९-२०) मंडळी ही एका ख्रिस्ती व्यक्तीची खरी ओळख आहे,त्या ख्रिस्ती व्यक्तीच्या पवित्रचरित्र्याची ती जननी असून मंडळी ही एका ख्रिस्ती व्यक्तीसाठी सर्वोच संस्था आहे,पण ख्रिस्ती व्यक्तीला हे समजणे अगत्याचे आहे की जगिक गोष्टीचा शिरकाव हा मंडळीत माझ्याद्वारे होऊ शकतो. म्हणून देवाच्या कृपेवर अवलंबून राहून मला माझ्या ख्रिस्तात अंश-अंश रीतीने बदलावे लागेल.आणि हे तेंव्हाच शक्य आहे जेव्हा मी ख्रिस्ताचा आज्ञेला पूर्ण नम्रतेने प्रतिसाद देईल.

**"आंग्लाळलेली ख्रिस्तीची नवी जात"**

"कृष्णपाल हा पहिला धर्मांतरित ब्राह्मण जेव्हा त्याने बाप्तिस्मा घेतला लोकांनी त्याला गावाबाहेर काढले तेव्हा विलियम कैरी म्हणाले."अशा तऱ्हेने ख्रिस्त स्वीकारला म्हणून गावाबाहेर प्रत्येक जण येत गेला,तर खरा ख्रिस्त पसरणार नाही या हिंदू समाजात.कारण खरा ख्रिस्त हा जगण्याची पद्धतही आहे.ती समोर राजच्या जगण्यात दिसायला हवी बाकीच्यांना सर्वांचा असा विश्वास बसायला हवा...की ख्रिस्ती हे रोजचे म्हणजे नेहमीचे जगणं आहे...पण विश्वासपूर्ण...नैतिक व समर्थ:वेगळं;अस घळलं तरच ख्रिस्त पोहोचेल.नाहीतर तो मिशनच्या भिंतीत बंद होईल,एक नवी जात होऊन.आंग्लाळलेली ख्रिस्तीची नवी जात."(**विलियम कैरी**)

आज देखील ही परिस्तिथी पहावयास मिळते,माझा संशोधनात मी एक गृहीतक मांडलेले आहे,आताचा आणि पूर्वीच्या  मिशन आणि मिशनरीमध्ये काय फरक आहे.त्यात सर्वात मोठे निष्कर्ष हेच आहे की आताच्या मिशन आणि मिशनरी स्थिर झालेल्या आहे.पुर्वी तसे नव्हेत ते शाश्वत सुवार्ता प्रचारात प्रवासीत आणि होते.आज भरपूर मंडळीत ख्रिस्त भिंतीच्या आत बंदीस्थ आहे,काही मंडळींनी नव-नवीन नावे चर्चला देऊन त्याला एका जातीत,भाषेत,स्थापत्यात आणि परंपरेत कोंबून ठेवलेले आहे.किती आश्चर्य-काही चर्चचा शिवाराबाहेर ख्रिस्त जातच नाही?ख्रिस्ताच्या राज्याची गती कमी आहे की जास्त?कोणावर टीका करत नाही.पण आज काही पाळक प्रश्न ऐकत नाही आणि उत्तराची रांगच लावून देतात, _जास्त बोलण्याने आणि आपला पक्ष ठेवल्याने आणि चांगल्या कर्माने कोणीही स्वतःला ख्रिस्ती म्हणवू शकत नाही.आज प्रश्न मंडळीने स्वतः स्वतःला विचारण्याची गरज आहे.माझी मंडळी आंग्लाळलेली ख्रिस्तीची नवी जात आहे? *की माझा प्रभू चर्चचा बाहेर माझ्या जीवनाद्वारे कार्यरत आहे.

**आपली मंडळी मानवी सत्तेत रोवली गेली आहे?की देवाच्या सत्तेशी:-**

"मंडळी म्हणजे एका  विशिष्ट नियमांचे पालन करण्यास बांधील असणारी आध्यात्मिक संस्था नाही. किंवा एका ठराविक पद्धतीचे साचेबंद धर्माचे प्रशिक्षण घेतलेल्या लोकांचा समूहही नाही.आपण ख्रिस्तामध्ये आणि देवामध्ये आहोत."**जॉन मैकआरथर.**

"बालपणीच बाप्तिस्मा देऊन ख्रिस्ती धर्माचे व आपल्या चर्चचे सभासद करणे,तारण झाले नसेल तरी दृढीकरनाच्या विधीने मंडळीत प्रवेश देने,प्रभू भोजनाने सार्वकालिक जीवन मिळते व देवाचे आशीर्वाद मिळतात हे खोटे शिक्षण देणे,आणि नाताळ,गुड फ्रायडे,ईस्टर व इतर सणात गुंतवून ठेवणे अशा गोष्टी पवित्र शास्त्राचे शिक्षण आहे असे या मानवी सत्तेने भासविले आहे,हा मानवी सत्तेतील ख्रिस्ती धर्म आहे."(**र.सु.मिरजकर**)आज मंडळीतील काही सभासद आणि मंडळी मानवी सत्तेतेली धर्माशी जोडली गेलेली आहे *मध्ययुगात पोप आणि त्याच्या सभासदांनी असे भासविले गेले की चर्चतर्फे आणि आम्ही जे विधी सांगू ते केल्यामुळे तुम्हाला स्वर्गाची प्राप्ती होईल पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याचा आवाज त्यांनी सामान्य जनतेला ऐकू दिला नाही,* उलट स्वर्गाचे प्रवेशित प्रमाणपत्र ज्या वर पॉपची हस्ताक्षरे होती.एक करोड रुपया पर्यंत विकली गेली,म्हणून ती सैतानाच्या पूर्ण मानवी सत्तेचा बंधनात

अडकली.आज मंडकीची संख्या एवढी वाढलेली आहे की एक ख्रिस्ती म्हणून मी पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याद्वारेच हे समजू शकतो की "देवाला घट्ट पकडलेली मंडळी;आणि देवाने घट्ट पकडलेली मंडळी कोणती आहे,मानवी सत्तेतील ख्रिस्ती धर्माला त्याचा गुलामगिरीतून सोडविणाऱ्या मार्टिन ल्युथर सारखे पाळक आणि सभासद जर आज निर्माण झाले( म्हणजे कृपा आणि विश्वासावर उभे आधारलेले ) तर ख्रिस्ती धर्मातील खोट्या शिक्षणाचा आणि पंथाचा नायनाट निश्चितच होईल.

**ख्रिस्ताने तुम्हाला धरून घेतले;आता तुम्हीही ख्रिस्ताला धरून घ्या:-**

"Et Teneo,Et Teneor" हे लॅटिन भाषेतील शब्द चार्ल्स स्पर्जन यांनी 1856 साली ब्रीदवाक्य म्हणनू आपल्या बायबल कॉलेजला दिले,याचा अर्थ "मिने तुला धरून घेतलेले आहे;आणि तुला धरून ठेवलेले आहे"संत पौल लिहितो "मी इतक्यात मिळवले किंवा इतक्यात मी पूर्ण झालो असे नाही,तर यासाठी मी पाठी लागतो की,ज्याकरिता *ख्रिस्त येशूने मला धरून घेतले ते मीही धरून घ्यावे."(फिलिप्पे-३:-१२).प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला हे माहीत असणे आवश्यक आहे की ख्रिस्ताने तुम्हाला धरून घेतलेले आहे,तो कधीही तुम्हाला सोडणार नाही,आणि त्याने वचन दिलेले आहे जगाच्या अंतिम दिवसापर्यंत मी तुमच्यासोबत आहे. १)मी धरून घ्यावे-जे जे देवाला प्रिय आहेमी सोडून द्यावे-जे जे देवाला अप्रिय आहे. २)मी धरून घ्यावे-जे जे देवाचा आज्ञेत आहे.मी सोडून द्यावे-जे जे सैतानाच्या अधिनतेत आहे._ ३) मी धरून घ्यावे-जे जे देवाच्या योजनेत माझ्या जीवनाद्वारे पूर्ण होणार आहे;मी सोडून द्यावे-जे जे सैतान माझ्या उपयोग करून करणार आहे.ख्रिस्ताने तुम्हाला धरून घेतलेले आहे.काय तुम्ही ख्रिस्ताला धरून घेतलेले आहे?.

**GOD'S WORLD REFLECTS GOD'S GLORY ( Genesis-1:1).Matthew Henry**

In the visible world t is easy to observe.

**Great variety**:- Several sorts of beings vastly differing in their nature and constitution from each other Lord Your works, and all are good

**Great beauty**:-The anure sky and the verdant earth are charming to the eye of the curious spectatior How transcendent then, must the beauty of the Creator be

**Great exactness and accuracy**:-Those, who with the help of microscopes, namowly look into the works of nature, find that nature appears far more fine than any work of art **Great power:-**The earth is not a lump of dead and inactive matter, but there is virtue in every creature. The earth itself has a magnetic power.

**Great order**:-There is a mutual dependence of beings, an exact harmony of motions, and an admirable chain and connec tion of causes manifold are.

**Great mystery** There are phenomena in nature which can- not be solved. But from what we see of heaven and earth, we may infer the eternal power and Godhead of the great Creator Our duty as Christians is always to keep heaven in our eyye and the earth under our feet.

**Now ye are clean through the word:( Matthew Henry:-**Now ye are clean through the word which I have spoken unto you" ( S.T.JOHN:- 15-3:-)"They were each clean, that is sanctified,by the truth of Christ, ch. and 17:17. That faith by which they received the word of Christ purified their hearts, Acts 15:9. The Spirit of grace, by the word, refined them from the dross of the world and the flesh. Apply it to all believers. The word of Christ is spoken to them; there is a cleaning virtue in the word. It cleanses as fire cleanses the gold from the dross. We then evidence that we are cleansed by the word when we bring forth fruit unto holiness.''

**एक ख्रिस्ती म्हणून आपले जीवन देवावर केंद्रित आहे की व्यर्थेतेवर:-**

**विश्वासराव** :-खरोखर ही मोठी खेदाची गोष्ट आहे.स्वर्गाधिपती देवाच्या गोष्टीपेक्षा मानवी जिव्हेने बोलावी अशी दुसरी कोणती गोष्ट आहे?

**वाचाळ**:-

मला तुमचे म्हणणे एकदम पटले पहा.तुमच्या म्हणण्यात पुष्कळ अर्थ आहे,मी तर असेही विचारतो की,परमेश्वराबाबत बोलण्याइतकी लाभदायक आणि सुखद गोष्ट दुसरी कोणती आहे?चांगल्या गोष्टीची हौस असणाऱ्यास दुसरी कोणती गोष्ट सुखद वाटेल?उदाहणार्थ,एखाद्याला इतिहास ह्या विषयावर बोलायला आवडतअसेल,अथवा कुणाला चमत्काराबद्धल,तर कुणाला अदभुताबाबत अगर चिन्हांबाबत बोलायला आवडत असेल,तरी अशा गोष्टींची आकर्षक आणि गोड मांडणी त्याला पवित्र शास्त्राखेरीज कोठे आढळेल.व्यर्थता ही आजच्या काळातील प्रत्येक मानवाची मूलभूत गरज आहे,जी त्याला नेहेमी नकोशी वाटते,पण त्याला व्यर्थता अंतिमतः पिडून घेते,देवाच्या दहा आज्ञेत एक आज्ञा अशी आहे,देवाचे नाव व्यर्थ घेऊ नको तरी काही बहाद्दर काइन प्रमाणे आत्मिकतेचा खोटा बुरखा घालून अशुद्ध हृदयाचे अर्ग देवासमोर आणतात.आणि आपला नाश ओढवून घेतात,शौलप्रमाणे अधिकाराचा गैरवापर करून वेदीपुढे अनाज्ञाकारीतेचे पाप करतात.प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने आपल्या व्यर्थेतेची बोली आणि वेळ मोजायला हवी,व्हाट्सएपवर ख्रिस्ती साहित्याच्या माध्यमातून कितीतरी अडमीन आणि सभासद व्यर्थेतेची बोली लावतात ही सांगायची गरज नाही,माझ्या लिहिण्यात,बोलण्यात,चालण्यात कोणता विषय आहे देवासंबंधी माझ्या व्यवहार व्यर्थतेच्या आहे?की माझे हृदय देवाकडे केंद्रित आहे.जर तुमचे हृदय देवाकडे केंद्रित असेल,तर तुम्ही आपल्या

लिहिण्यात,बोलण्यात आणि चालण्यात फक्त देवाच्या गोष्टी करणार,बाह्य गोष्टी नाही. **पुढारीपण हे एका ख्रिस्ती व्यक्तीची मक्तेदारी असू शकते का?**

_"ख्रिस्ती चर्चचे मठाधिपती पण महाराजांसारखे राहतात की काही.एक आहे मात्र.ख्रिस्ती लोकांत पुजारीपण जन्मानं ठरत नाही."पुढारीपण कोणाची मक्तेदारी नसून,ती देवाच्या कृपेवर आधारित देवाच्या राज्यातील सेवा करण्यास दिलेले अमूल्य वरदान आहे,ख्रिस्त स्वर्गातून आला,पण त्याला देखील मनुष्यात राहून आपले अधिकार वापरावे लागले.स्वर्गीय राजपुत्र म्हणून तो पृथ्वीवर जगला नाही.तर स्वर्गात जाण्यासाठी मनुष्य बनून देवाच्या राज्याचे कार्य पूर्ण करून मग स्वर्गात जाने हा क्रम ख्रिस्ताने लावून दिला.आता ख्रिस्ती पुढाऱ्याला हे समजणे अत्यंत गरजेचे आहे,की पुजारीपण जन्मजात जरी असले (ज्याची अनादी काळापासून निवळ झाली आहे) तरी पृथ्वीवर प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला देवाच्या कृपेने देवाने दिलेले इप्सित पूर्ण करणे भाग आहे. अंतिमतः विल्यम कैरीच्या शब्दात "शेवटी फक्त ख्रिस्तच जाणतो.कोण त्याला जवळ आहे,कोण खरा...खोटा मुखवटा आपल्याला चकवू शकतो. देवाला नाही.अन असही नाही....की चालायचं ठरल्यावर पुन्हा परत मागे वळणार नाही,एखादा.....ख्रिस्ताला धरून देणारा यहुदा त्याच्याबरोबरच तर चालत होता प्रथम......तेव्हा न्याय करू नका,फक्त प्रार्थना करा.

**ख्रिस्ती धर्म हा इतर धर्मापासुन वेगळा आहे सिकलेयर पेटर्सन** *"मसीह का मसिहयत के साथ घनिष्ठ संबंध,मसीह धर्म का विशिष्ट लक्षण हे आप बोद्ध धर्म से बुद्ध का नाम अलग कर दे,और उसके समूह तंत्र से प्रकाशन करणे वाले व्यक्तित्व को पूर्णतः निकाल दे ,यदी आप इस्लाम से मोहमद का नाम हटा दे,अथवा पारसी धर्म से जोरास्तेर का व्यक्तीव हटा दे,तो भी इन धर्मो की शिक्षा अखंड रहेगी;उनका व्यवहारिक मूल्य,जैसा की वह हे,न तो जोखीम मे पडेगा और न वह कम होगा. *परन्तु मसिहियत (मसीह धर्म) से मसीह का नाम और व्यक्तीत हटा दे तो फिर उसमे क्या शेष रह जाएगा?मसीह विश्वास की संपूर्ण वास्तविकता और तत्व मसीह पर विश्वास के उपर केंद्रित हे;* उसके बिना कुछ भी नहि हे."*

**एक ख्रिस्ती म्हणून तुम्ही वर्तमानात देवाचे कार्य करतात की भविष्काळासाठी राखून ठेवतात :-**

"जे लोक या बाबतीत सावध राहतात त्यांच्या हातास काहीच चिकटता कामा नये.त्यांच्यावर परमेश्वर आपल्या उत्तम आशीर्वादांची वृष्टी करतो.जगाच्या वर्तमान दुर्दशेपेक्षा अधिक किंमत जे भविष्यातील पावसाळ्यात देतात त्यास परमेश्वराकडून आशीर्वाद प्राप्त होत नाही.संत पाऊल सांगतो देवाच्या कार्याची गती वाढावी,जो ख्रिस्ती व्यक्ती भविष्यासाठी देवाचे कार्य राखून ठेवितो तो आपल्या योजनेत निष्फळ ठरला आहे.एक ख्रिस्ताच्या प्रतिनिधी म्हणून मी आजचे कार्य उद्यावर टाकू शकत नाही.जर एलियाने प्रार्थना बंद केली असती तर गबरीयल स्वर्गदूताला उत्तर आणण्यास वेळ लागला असता,जर यहोशवा आणि त्याच्या सेनानींनी यारीहो या शहराच्या तटबंदीच्या फक्त सहा चक्कर मारल्या असत्या तर ती पडली नसती,जर निनवे शहरातील लोकांनी पश्चाताप केला नसता तर त्यांच्या नाश अटळ

होता,(हे सर्वे उदाहरणे देवाला नेहेमी शक्य आहे,फक्त मनुष्याच्या प्रतिक्रिवर आधारलेले काही परिणाम असतात,त्या दृष्टीकोनातून).पण मी आज मोसे प्रमाणे आव्हान करितो"जो कोणी यहोवाच्या पक्षाचा आहे त्याने माझ्याकडे यावे"(निर्गम 32-26) सर्व लेवी लगेच मोशेचा पक्षात गेले,देवाचे कार्य भविष्यावर न ढकलता मोशेने लेवींना आदेश दिला.राहिल्या लोकांच्या घात करा,एक ख्रिस्ती पुढारी म्हणून मी देवाचे कार्य भविष्यात ढकलत नाही,जसे मोशेने केले तसे आज आपल्याना देवाच्या राज्याची गती वाढविण्यासाठी वर्तमानात आपले सर्वोत्तम देने भाग आहे. *सद्यस्थितीत मी कोणते कार्य करत आहे?.

## संदर्भग्रंथसूची:-


१) . **खरे शिष्यत्व विलियम मैकडोनाल्ड,महान प्रीती प्रकाशन,प्रथमावृत्ती, ,पृ क्र-१३०-१३१**
२) **यात्रेकरूचा प्रवास, जॉन बनिया,उन्नती प्रकाशन,प्रथमावृत्ती,बेळगाव,पृ क्र:-६५**
३) **GOD'S WORLD REFLECTS GOD'S GLORY ( Genesis-1:1).Matthew Henry Study Bible.**
४) **,मी माझा देश..माझी मंडळी, रेव्ह सुभाष डोंगरदिवे,महान प्रीती प्रकाशन,पुणे.२०१० , प्रथमावृत्ती.पृ क्र-७८**
५) **प्रभूने आपल्या मंडळीसाठी केलेली योजना,जॉन मैकआरथर, प्रकाशन ग्रेस ऑफ इंडिया.२००५,प्रथमावृत्ती,पुणे पृ क्र-१६२**
६) **तारलता कीं कायमचे बदललात, स्टीव्ह फर्नांडिस,एकदा,लव्ह महाराष्ट्र.पुणे,२०१५ प्रथमावृत्ती पृ क्र-२४**
७) **,खऱ्या परिवर्तनाची सात लक्षणे, पीटर मास्टर्स,जी एस प्रकाशन.मुंबई,२०१७,पृ क्र-१४-१५**